---

# व्याकरण

विद्यार्थ्यांच्या टप्प्यांमध्ये, शिकण्याच्या गतीमध्ये थोडाफार फरक असतो. तसेच काही घटकांची उजळणी दोन तीन वर्षे पुन:पुन्हा होणे दृढीकरणासाठी उपयोगी ठरते. हे लक्षात घेऊन व्याकरणातील काही घटकांविषयीचे तेच प्रश्न दोन किंवा तीन इयत्तांसाठी दिले आहेत.

**विरामचिन्हे**

**पूर्णविराम**

योग्य ठिकाणी पूर्णविराम देऊन वाक्य पुन्हा लिही.

१) मीना सकाळी उठली तिने दात घासले आणि अंघोळ केली तिने भाकरी खाल्ली ती शाळेत गेली
२) सुरेशची बकरी हरवली तो घाबरला आणि रडायला लागला झाडामागून बकरीचा आवाज आला सुरेशला आनंद झाला
३) लाल सिग्नल लागला सायकल थांबली रिक्षा थांबली बस थांबली सिग्नल हिरवा झाला सगळे निघून गेले
४) घंटा वाजली मधली सुट्टी झाली मुलांनी ताटे घेतली ती ओळीत उभी राहिली ताईंनी खिचडी दिली मुलांनी खिचडी खाल्ली
५) आजीचा मोबाईल वाजला रजियाने मोबाईल तिला नेऊन दिला आजी काकांशी बोलली मोबाईल अचानक बंद झाला काकांनी पुन्हा फोन केला

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

**प्रश्नचिन्ह व पूर्णविराम**

योग्य त्या ठिकाणी प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविराम देऊन वाक्य पुन्हा लिही

१) दार टकटक वाजले बाहेर कोण आले
२) किती वाजले शाळेची वेळ झाली का
३) बसने बाजारात पोचलो कोणती भाजी घ्यायची भेंडी घ्यायची की वांगी
४) सारिका घसरून धपकन पडली तिला कोठे लागले फार दुखले का रक्त आले का
५) लग्नाला कोणाकोणाला नवीन कपडे करायचे आजच दुकानात जाऊ कोणत्या दुकानात जायचे
६) माझ्या दप्तरात वह्या पुस्तके कंपासपेटी पट्टी आणि रंगीत कागद आहेत तुझ्या दप्तरात काय काय आहे
७) झाली का परीक्षा कसा होता पेपर

**स्वल्पविराम व पूर्णविराम किंवा प्रश्नचिन्ह**

योग्य त्या ठिकाणी स्वल्पविराम व प्रश्नचिन्ह किंवा पूर्णविराम देऊन वाक्य पुन्हा लिही

१) आज घरी आजी आजोबा मामा मामी आणि मावशी आले
२) संजय चल बाजारात जाऊया आणि नवीन कपडे घेऊया
३) आंमच्या घरी पाच कोंबड्या सहा बकऱ्या आणि दोन बैल आहेत तुमच्याकडे
४) ए आजी आज खीर करशील का मला खूप आवडते
५) अरे थांब की मझ्यासाठी पळतोस काय

---

## स्वल्पविराम, पूर्णविराम व अवतरणचिन्ह

योग्य त्या ठिकाणी स्वल्पविराम, पूर्णविराम व अवतरणचिन्ह देऊन वाक्य पुन्हा लिही

१) मला दे ना तो पतंग वनिता म्हणाली मांजा तू धर हं
२) शाळा सुटली आता घरी पळा शिपाई काका म्हणाले मुले घरी पळाली
३) तू माझ्या घरी ये सपना विशालला म्हणाली मग आपण चिंचोके गोळा करू
४) सुरेश म्हणाला आज बाजारात जायलाच हवे घरातले तेल मीट पार संपले आहे
५) आजीने सांगितले जखमेवर हळद लाव

## स्वल्पविराम, पूर्णविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह व अवतरणचिन्ह

योग्य त्या ठिकाणी स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्ह व अवतरणचिन्ह देऊन वाक्य पुन्हा लिही

१) आज शाळेला सुट्टी का मावशीनी मुलांना विचारलं
२) झाडाला चिंचा बघ काय मस्त आल्यात अशोक म्हणाला
३) मंगलानी विचारलं तुला आवडली का मी लिहिलेली गोष्ट
४) बाबा आनंदाने म्हणाले अरे वा बाळानी आज पहिली दोन पावले टाकली आजचा दिवस लक्षात राहील
५) अरेरे वडाचं किती जुनं झाड तोडलं त्यांनी आजोबा उद्गारले त्यांच्या डोळ्यात पाणी आले
६) संगीता आई म्हणाली उठतेस ना सात वाजले
७) संतोष तुला आणखी भाकर देऊ आजीने विचारले की भात देऊ
८) ए चंदू ए सुमे अक्षय ओरडला येता ना खेळायला
९) जनाबाई जनाबाई आजीबाई सांगत आल्या तुझ्या बकरीनी करडू दिलं बघ
१०) एक पेरू तुला घे रंजना म्हणाली आणि एक मला दे चालेल

---

**क्रियापद**

गाळलेल्या जागा भर, काळानुसार क्रियापदाचे रूप घाल.

१) काल खूप पाऊस पडला. उद्याही पाऊस _______ असे वाटते. ऑगस्टमध्ये नेहमीच आमच्या गावात खूप पाऊस ________.
२) सविताने काल त्याला पुस्तक ________, तो ते उद्या मला देईल.
३) दर रविवारी ते सगळे चर्चमध्ये जातात. एकदा आपणही त्यांच्याबरोबर _______.
४) मागच्या आठवड्यात केबलवाल्याने मुलांचा सिनेमा _________. या आठवड्यात तो मोठ्यांचा सिनेमा दाखवणार आहे.
५) सरांनी आम्हाला काल मस्त गोष्ट सांगितली. ते नेहमीच आम्हाला छान छान गोष्टी __________.

लिंग वचनानुसार क्रियापदाचे रूप बदल.

१) सांगलीला जाण्यासाठी दिनेश तासगावहून निघाला. त्याची ताई भिलवडीहून __________.
२) सीमाने एक पुस्तक वाचलं. मनोजनी तीन पुस्तकं _________.
३) पाहुणे येणार होते. आईने त्यांच्यासाठी बरेच पदार्थ केले. मसालेभात _______, वांग्याची भाजी __________, बटाटेवडे __________ पुऱ्या ________, लसणाची चटणी ________.
४) खारीला शेंगदाणे आवडतात, हरणाला पाला _________, माकडाला फळे _________, गायीला गवत _________, पक्ष्याला अळ्या __________.
५) आईनी साडी धुतली, बाबांनी पायजमा _________, दादाने शर्ट __________, ताईने स्कर्ट _________.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : आठवी

---

क्रियापदाचे चुकलेले रूप दुरुस्त कर.

१) सतीश मामाला ई-मेल लिहतो.
२) मी आजीच्या घरी गेलेलो.
३) मी विहिरीवरून पाणी घेऊन आली. मग शाळेत गेली.
४) तो गावाला गेलो.
५) त्यांनी काम करतात.

अर्थ न बदलता व उभयान्वयी अव्यय न वापरता वाक्यांची जोडणी कर. क्रियपदाचे रूप बदलून घे.

१) तो धावत होता. तो पडला.
२) कांचन पुस्तक वाचत होती. तिला झोप लागली.
३) आईने थोपटले. बाळ लगेच झोपी गेले.
४) दादानी कपडे धुतले. खळबळले. पिळले. वाळत टाकले.
५) आजीने सुईत दोरा ओवला. मंगलने आजीला मदत केली.

संदर्भ लक्षात घेऊन योग्य क्रियापद घालून वाक्य पूर्ण कर.

१) आईने पीठ _____ आणि भाकरी _____.
२) पुरेसा पाऊस न झाल्यामुळे उभे पीक _____.
३) भूकंपामुळे समोरच्या उंच इमारती _____.
४) सुट्टीत आम्हाला काकांच्या घरी _____ बोलावले होते.
५) डोंगर _____ स्मिता पाय _____ पडली.

---

**क्रियाविशेषण**

दिलेल्या वाक्यातली क्रियाविशेषणे शोध आणि त्याखाली रेघ ओढ

१) काल खूप मोठा पाऊस आला.
२) बस पकडण्यासाठी काकी झपाझप निघाली.
३) माकडांनी उड्या मारल्यामुळे झाडाच्या फांद्या गदागदा हलायला लागल्या.
४) कवी बा. भ. बोरकर येथे राहात होते.
५) खुदकन् हसले, की बाळाला उचलून घ्यावेसे वाटते.
६) बकरी मन्यामामाच्या विहिरीत पडली.
७) ताईने दारापाशी रेखीव रांगोळी काढली.
८) विनोद वाचून काका खो खो हसत सुटला.
९) झुळझुळ वाहणारे पाणी पाहून मला एक कविता आठवते.
१०) संध्याकाळी आपण भेटू आणि बोलू.

**अव्यय**

**उभयान्वयी अव्यय**

त्यामुळे, म्हणून, कारण, जर-तर, जेव्हा-तेव्हा, किंवा, परंतु यापैकी योग्य ते अव्यय वापरून वाक्य तयार कर.

१) पाऊस पडला. चिखल झाला.
२) तो सहलीला आला नाही. तो आजारी पडला.
३) काका येईल. आम्ही खूप मजा करू.
४) आणीबाणीचा प्रसंग आला की साखळी ओढा.
५) गावात जत्रा आली होती. मी जाऊ शकले नाही.

---

**शब्दयोगी अव्यय**

शिवाय, पाशी, मधून, जवळ, खाली, वर, मुळे, कडे, कडून, वरून, पासून, पर्यंत यापैकी योग्य ते शब्दयोगी अव्यय गाळलेल्या जागी भर.

१) सीमा तिच्या मावशी_________ आली आणि मैत्रिणी_________ गेली.
२) सोमवार___________ शनिवार__________ क्रीडा स्पर्धा चाललेल्या होत्या.
३) फताड्या पायाचा हा पाणपक्षी तळ्यातल्या पसरट पानां___________ चालत जातो.
४) मित्राच्या बोलण्याचा त्याच्या मना__________ चांगला परिणाम झाला
५) कलम ३७९_________ गुन्हेगाराला अटक झाली.
६) सेंद्रिय खता__________ यंदा पीक दुप्पट आले.
७) आमच्या गावा__________ ओढा आहे.
८) लहानपणी आजी__________ बसून आम्ही रोज गोष्ट ऐकायचो.
९) चष्म्या__________ आजोबांना वाचता येत नाही.
१०) गवता___________ जाणारी पाऊलवाट वळणावळणांची होती.

**केवलप्रयोगी अव्यय**

दिलेल्या पर्यायातून योग्य ते केवलप्रयोगी अव्यय निवडून गाळलेल्या जागी भर.

१) ____ ! दिलेले काम तू वेळेत पूर्ण केलेस! (अबब, शाब्बास, अच्छा, अरेरे)
२) ____ ! किती हा कचरा! (अंहं, आई ग, छी, वा)
३) ____ ! मी असे काहीही करणार नाही ! (हट्, अच्छा, वा, शाब्बास)
४) ____ ! एकही शब्द बोलू नकोस! (चुप्, अहाहा, अबब, आई ग)
५) ____ ! तू सुद्धा आमच्याबरोबर नदीवर येत आहेस तर! (वा, हट्, अंहं, अच्छा)
६) ____ ! कंबर मोडली माझी! (शाब्बास, आई ग, अबब, चुप्)
७) ____ ! काय सुंदर चित्र आहे हे! (अरे बापरे, हट्, अहाहा, छी)
८) ____ ! बाबांनी सांगितलेले काम करायचे राहूनच गेले! (वा, अरे बाप रे, अंहं, अबब)

९) ____ ! काकूला हे अजिबात चालणार नाही! (शाब्बास, अच्छा, अहाहा, अंहं)
१०) ____ ! काय छान तबला वाजवलास तू! (वा, छी, अरेरे, अरे बापरे)
११) ____ ! केवढा मोठा हा साप! (अच्छा, वा, अबब, अरेरे)
१२) ____ ! तो धपकन् पडला! (शाब्बास, हट्, चुप्, अरेरे)

**संयोगचिन्ह**

दिलेल्या वाक्यात योग्य ठिकाणी संयोगचिन्ह वापर.

१) सारखे वर खाली करून आता त्याचे पाय दुखायला लागले आहेत.
२) सकाळपासून जो तो आपापल्या कामात दंग आहे.
३) यापुढे जे काही बरे वाईट होईल त्याला आपण सामोरे जाऊ.
४) अशा छोट्या मोठ्या कार्यक्रमांना दादासाहेब जात नाहीत.
५) राजूला झाडावर चढलेले पाहून माईचा जीव वर खाली होऊ लागला.
६) आमच्या काकांना गायन वादनाची भारी आवड आहे.
७) दिवस रात्र तिच्या मनात नोकरीचा विषय घोळत असे.
८) धरणाच्या बांधकामात गावकऱ्यांना दिवस रात्रीचेही भान राहात नसे.
९) कोकण रेल्वेमुळे मुंबई कणकवली प्रवास सोयीचा झाला आहे.
१०) तारकर्लीचा किनारा नारळी पोफळीच्या बागांनी व्यापलेला आहे.
११) दिवाळीचा सण चांगला चार पाच दिवस साजरा केला जातो.
१२) मला माझ्या मनासारखे नाही मिळाले, तर मी आदळ आपट करतो.
१३) चला आपण सर्व पाला पाचोळा जमा करूया.
१४) मुंबई शहरात छोट्या मोठ्या खूप इमारती आहेत.
१५) दसऱ्यानंतर शेतात कापणी मळणीचा हंगाम असतो.

---

**प्रश्नार्थक सर्वनाम**

अधोरेखित शब्दासाठी प्रश्न तयार कर.

१) काल आजी गणपतीकरिता गावाला गेली. ती पूजेचे साहित्य घेऊन बसने गेली.
२) काल आजी गणपतीकरिता गावाला गेली. ती पूजेचे साहित्य घेऊन बसने गेली.
३) काल आजी गणपतीकरिता गावाला गेली. ती पूजेचे साहित्य घेऊन बसने गेली.
४) काल आजी गणपतीकरिता गावाला गेली. ती पूजेचे साहित्य घेऊन बसने गेली.
५) काल आजी गणपतीकरिता गावाला गेली. ती पूजेचे साहित्य घेऊन बसने गेली.
६) काल आजी गणपतीकरिता गावाला गेली. ती पूजेचे साहित्य घेऊन बसने गेली.
७) अजय आणि मनोज दर रविवारी सायकलने बाजारात जातात. येताना पिशवीत भाजीपाला आणि खाऊ आणतात.
८) अजय आणि मनोज दर रविवारी सायकलने बाजारात जातात. येताना पिशवीत भाजीपाला आणि खाऊ आणतात.
९) अजय आणि मनोज दर रविवारी सायकलने बाजारात जातात. येताना पिशवीत भाजीपाला आणि खाऊ आणतात.
१०) अजय आणि मनोज दर रविवारी सायकलने बाजारात जातात. येताना पिशवीत भाजीपाला आणि खाऊ आणतात.
११) अजय आणि मनोज दर रविवारी सायकलने बाजारात जातात. येताना पिशवीत भाजीपाला आणि खाऊ आणतात.
१२) अजय आणि मनोज दर रविवारी सायकलने बाजारात जातात. येताना पिशवीत भाजीपाला आणि खाऊ आणतात.
१३) आज माझ्या बाबांचा वाढदिवस आहे. आम्ही घरीच षटकोनी आकाराचे भेटकार्ड तयार केले.
१४) आज माझ्या बाबांचा वाढदिवस आहे. आम्ही घरीच षटकोनी आकाराचे भेटकार्ड तयार केले.
१५) आज माझ्या बाबांचा वाढदिवस आहे. आम्ही घरीच षटकोनी आकाराचे भेटकार्ड तयार केले.
१६) आज माझ्या बाबांचा वाढदिवस आहे. आम्ही घरीच षटकोनी आकाराचे भेटकार्ड तयार केले.

---

१७) आज माझ्या बाबांचा वाढदिवस आहे. आम्ही घरीच षटकोनी आकाराचे भेटकार्ड तयार केले.

१८) आज माझ्या बाबांचा वाढदिवस आहे. आम्ही घरीच षटकोनी आकाराचे भेटकार्ड तयार केले.

१९) नजमाचा भाऊ हमीद रमजानईदच्या दिवशी गावाबाहेरच्या ईदगाहवर नमाज करण्याकरिता चालत गेला.

२०) नजमाचा भाऊ हमीद रमजानईदच्या दिवशी गावाबाहेरच्या ईदगाहवर नमाज करण्याकरिता चालत गेला.

२१) नजमाचा भाऊ हमीद रमजानईदच्या दिवशी गावाबाहेरच्या ईदगाहवर नमाज करण्याकरिता चालत गेला.

२२) नजमाचा भाऊ हमीद रमजानईदच्या दिवशी गावाबाहेरच्या ईदगाहवर नमाज करण्याकरिता चालत गेला.

२३) नजमाचा भाऊ हमीद रमजानईदच्या दिवशी गावाबाहेरच्या ईदगाहवर नमाज करण्याकरिता चालत गेला.

२४) बुधवारी भारतीय संघाने दिल्ली येथे तीन धावांनी क्रिकेटचा सामना जिंकला. सर्वांनी फटाके वाजवून आनंद साजरा केला.

२५) बुधवारी भारतीय संघाने दिल्ली येथे तीन धावांनी क्रिकेटचा सामना जिंकला. सर्वांनी फटाके वाजवून आनंद साजरा केला.

२६) बुधवारी भारतीय संघाने दिल्ली येथे तीन धावांनी क्रिकेटचा सामना जिंकला. सर्वांनी फटाके वाजवून आनंद साजरा केला.

२७) बुधवारी भारतीय संघाने दिल्ली येथे तीन धावांनी क्रिकेटचा सामना जिंकला. सर्वांनी फटाके वाजवून आनंद साजरा केला.

२८) बुधवारी भारतीय संघाने दिल्ली येथे तीन धावांनी क्रिकेटचा सामना जिंकला. सर्वांनी फटाके वाजवून आनंद साजरा केला.

२९) नंदिनीच्या घराजवळच्या पिंपळाच्या झाडावर वरच्या फांदीवर चिमणीने घरटे बांधले आहे.

३०) नंदिनीच्या घराजवळच्या पिंपळाच्या झाडावर वरच्या फांदीवर चिमणीने घरटे बांधले आहे.

३१) नंदिनीच्या घराजवळच्या पिंपळाच्या झाडावर वरच्या फांदीवर चिमणीने घरटे बांधले आहे.

३२) नंदिनीच्या घराजवळच्या पिंपळाच्या झाडावर वरच्या फांदीवर चिमणीने घरटे बांधले आहे.

---

**संधी**

संधी करून लिहा

१) सत् + चरित्र
२) उत् + लंघन
३) उत् + शृंखल
४) सत् + मार्ग
५) मन: + वृत्ती
६) तेज: + निधी
७) नि: + अंतर
८) नि: + तेज
९) मन् + ताप
१०) सूर्य + उदय
११) देव + आलय
१२) विद्या + अर्थी
१३) उमा + ईश

संधी सोडवून लिही

१) गणेश
२) सुरेंद्र
३) सूर्यास्त
४) सदैव
५) सदिच्छा
६) अधोमुख

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : आठवी

---

**समास**

समास ओळखून नाव लिही

१) यथाशक्ती
२) कष्टसाध्य
३) नीलकंठ
४) रामलक्ष्मण
५) देवपूजा
६) मीठभाकर
७) खरेखोटे
८) आखुडशिंगी

**अलंकार**

**प्रश्न:**

१) ‘यमक’ या अलंकाराचे उदाहरण सांगून त्याचे लक्षण लिही.
२) ‘उपमा’ या अलंकाराचे उदाहरण सांगून त्याचे लक्षण लिही.
३) ‘उत्प्रेक्षा’ या अलंकाराचे उदाहरण सांगून त्याचे लक्षण लिही.

खालील काव्यपंक्तीतील अलंकार ओळख व त्याचे वैशिष्ट्य थोडक्यात लिही.

१) हिरवळ आणिक पाणी
तेथे स्फुरती मजला गाणी

२) बहरली जिथे हिरवळीत कोमल फुले
मी फूलपाखरू झुले तिथे चिमुकले

---

३) श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे
क्षणात येते सरसर शिरते क्षणात फिरुनी उन पडे

४) सुसंगती सदा घडो, सृजन वाक्य कानी पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥

५) किती सिंहाचे रूप डौलदार
किती घोड्याची मान बाकदार
अहो सुंदर दिसतात जगी सारे
अंग माझे वाकडे मात्र कारे ॥

६) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे.
७) उंदराचे डोळे मण्यासारखे चमचमत होते.
८) गोदावरीचे जल स्फटिकासारखे शुभ्र आहे.
९) हिमकण आकाशातून खाली पडतात तेव्हा जाईच्या फुलांच्या नाजुक पाकळ्यांसारखे दिसतात.
१०) कशी झोकात चालली गवळ्याची पोर, जशी चवथीच्या चंद्राची कोर.
११) वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे
१२) कापसाचे शेत माझे हो फुलोनी शुभ्र सारे ।
वाटती की हे नभीचे खाली आले सर्व तारे ॥
१३) पिवळे तांबूस उन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई, सोने वाटे हावुनिया दूर
१४) किती माझा कोंबडा मजेदार । मान त्याची कितीतरी बाकदार ॥
शिरोभागी तांबडा तुरा हाले । जणू जास्वंदी फूल उमललेले ॥
अर्धपायी पांढरीशी विजार । गमे विहंगातील बडा फौजदार ॥

१५) वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे
मंगल तोरण काय बांधले नभोमंडपी कुणी भासे ॥

---

## वृत्त

### प्रश्न

१) 'भूजंगप्रयात' या वृत्ताचे लक्षण सांगून एक उदाहरण लिही. एका ओळीचे लघु - गुरु- गण लिही.

२) 'वसंततिलका' या वृत्ताचे लक्षण सांगून एक उदाहरण लिही. एका ओळीचे लघु - गुरु- गण लिही.

३) 'मालिनी' या वृत्ताचे लक्षण सांगून एक उदाहरण लिही. एका ओळीचे लघु - गुरु- गणही लिही.

खालील पद्यपंक्तींचे गण पाड व वृत्त कोणते ते ओळख

१) मना श्रेष्ठ धारिष्ट्य जीवी धरावे

२) गमू पंथ आनंत या राघवाचा

३) नदीच्या किनारी नदीला म्हणावे

४) झुरे आज वारा कशाने कशाने

५) नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी

६) दुकानावरी लाविल्या लांब पाट्या ।
मना थांबुनी वाच रे वाच त्या ॥

७) द्रव्यास हे गमन - मार्ग यथावकाश

८) दे दान गुप्त, उपकार कधी न बोले

९) जेथे समस्त बहिरे बसतात लोक

१०) आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश

११) त्यांतील एक कल हंस तटी निजेला

१२) टाकी उपनाह पदे अतिमंद ठेवी
केली विजार वरी डौरही मौन सेवी

१३) पखरण बघ घाली भूवरी पारिजात

१४) सुटुनि खग पळाला बैसला शाल शाखे

---

१५) सहजच ऋतु साही होती एकत्र गोळा
१६) कलकल कलहंसे फार केला सुटाया
१७) परिमल उधळी हा सोनचाफा दिशात
१८) हरिगुण पिक गाती नाचती ते कलापी

खालील पद्यपंक्तींचा अभ्यास करून त्यांचे वृत्त कोणते ते ओळख व लिही. प्रत्येक चरणात अक्षरे किती तेही लिही.

१) बडे घारगे केशरी भात भाज्या
खिरी गोड लाडू भजी वा करंज्या
तसे तूप ताजे पुरी ती गव्हाची
मुला हौस वाटे अशा भोजनाची

२) नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी
नमो आर्यभूमी जिथे वाढलो मी
नमो पुण्यभूमी जियेच्याच कामी
पडो देह माझा सदा ती न मी मी

३) येणें परी परिसतां अतिदीनवाचा ।
हेलावला नळ पयोधि दया रसाचा ॥
सोडी म्हणे, विहर जा अथवा फिराया ।
राहे यथानिज मनोरथ हंसराया ॥

४) येथे समस्त बहिरे बसतात लोक
का भाषणे मधुर तू करिशी अनेक,
हे मूर्ख यांस किमपीही नसे विवेक
कोकीळ वर्ण बघुनी म्हणतील काक

---

५) सुटुनि खग पळाला बैसला शाल शाखे
क्षणभरी निजदेही मुक्ति विश्रांती चाखे
स्वजन तव तयाचे भोवताले मिळाले
कवलिति निजबंधू बाष्पबिंदू गळाले ।

६) निरुपम तव देखे बाग पीयुषवापी
हरिगुण पिक गाती नाचती ते कलापी
सहजच ऋतु साही होती एकत्र गोळा
कधीही न समजे हा पावसाळा उन्हाळा ।